# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. विशेष स्थायी समिती सभा दि. ०४/०५/२०१९

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष स्थायी समिती सभा शनिवार दि. ०४/०५/२०१९ रोजी सभा सुचना क्र. ०१ दि. ०३/०५/२०१९ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. रवि व्यास हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य -**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. व्यास रवि वासुदेव | मा. सभापती |
| २. | श्री. पाटील धृवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ३. | श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल | सदस्य |
| ४. | श्रीम. यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ५. | श्री. श्रीप्रकाश जिलेदार सिंह | सदस्य |
| ६. | श्री. राजीव मेहरा | सदस्य |
| ७. | श्री. म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ८. | श्रीम. वर्षा गिरधर भानुशाली | सदस्या |
| ९. | श्री. राकेश रतिशचंद्र शाह | सदस्य |
| १०. | श्रीम. निला बर्नाड सोन्स | सदस्या |
| ११. | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| १२. | श्रीम. दिप्ती शेखर भट्ट | सदस्या |
| १३. | श्रीम. वंदना विकास पाटील | सदस्या |
| १४. | श्रीम. तारा विनायक घरत | सदस्या |
| १५. | श्रीम. वंदना मंगेश पाटील | सदस्या |
| १६. | श्री. जुबेर इनामदार | सदस्य |

**गैरहजर सदस्य – निरंक**

**मा. सभापती :-**

सचिवांनी सभेला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष स्थायी समिती सभा शनिवार दि. ०४/०५/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लालबहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०१ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे**. प्रकरण क्र. १, **पावसाळ्यापूर्वी नाले सफाई कामाच्या निविदेतील दरास मंजुरी मिळणेबाबत.धृवकिशोर पाटील:-**

मा. सभापती साहेब हे दर आले आहेत त्या दरामध्ये आपण इतर विभागाची तुलना केली इतर विभागामध्ये पोकलन, जेसीपी चालू आहे त्याच्यामध्ये तो रेट कमी आहेत. आरोग्य विभागामध्ये हे रेट जास्त आहेत माझी आपणास विनंती आहे त्या रेटचा अभ्यास केला पाहिजे.

**श्रीप्रकाश जिलेदार सिंह :-**

मा. सभापती साहेब पिछले साल का रेट बताईए ना.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो गेल्या वर्षाच्या दराएवढेच आहे फक्त मजूर थोडा बढाया है।

**श्रीप्रकाश जिलेदार सिंह :-**

कितना बढा।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

पिछले साल ११०४ मजूर थे अभी ११२५ मजूर है।

**श्रीप्रकाश जिलेदार सिंह :-**

मा. सभापती साहेब रेट कब मंजूर हो गया निर्णय कभी लेने का?

**धृवकिशोर पाटील :-**

५(२)२ खाली मा. आयुक्ताना अधिकार आहेत. आयुक्त साहेब कोटेशन मागवून इमेजिएट करू शकतात. त्याप्रमाणे आयुक्तांनी मागवावे.

**श्रीप्रकाश जिलेदार सिंह :-**

मा. सभापती साहेब पास होने से मुझे कुछ लेना देना नही। पास हो या नही हो मेरे वॉर्ड का जो रेल्वे समांतर नाला है वह साफ नही हूवा तो हमारे यहॉ टोटल बिल्डींग निचे है। ग्राऊन्ड फ्लोर में सबके यहा पाणी भरता है। ३-४ फिट इस्ट में पाणी भरता है। पूरी जबाबदारी प्रशासन की रहेगी वह आप लोग देख लिजिए। ऐसा कूछ रहेगा तो में आंदोलन करूगा।

**दिप्ती भट :-**

मा. सभापती साहेब मिरारोड शॉपिंगच्या तिथे जो नाला आहे तिकडे स्टे आणून ठेवला आहे. ते कसे साफ करणार? कारण तिकडे पूर्ण नया नगरचा पाणी तिथून येते. आता पण नाल्याचे काम चालू आहे. बंद करतील तर खूप प्रॉब्लेम होतो. ते आपण कसे करणार?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

त्या स्टेची प्रोसिजर काय आहे ते मी बघतो लॉ ऑफिसरशी चर्चा करतो काय मार्ग काढता येतो ते बघतो.

**दिप्ती भट :-**

त्याच्यामध्ये तीन क्रॉसीग करायला लागतील असे आहे त्याचा आरोग्यातर्फे आपण रिपोर्ट पाठवा. पाणी जाणार नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ठीक आहे. आपण व्हिजीट करून कसा मार्ग काढता येईल ते बघू.

**दिप्ती भट :-**

अमृत योजनेचे काम चालू आहे. तीन नाल्यांचे छोटे क्रॉसींग केले तर पाणी व्यवस्थीत निघणार. लवकर ठेका दिला तरे बरे होईल.

**जुबेर इनामदार :-**

पाणपट्टेसाहेब धृवकिशोर पाटील साहेबांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे. त्याची खरी परिस्थिती काय आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो, सदरचा विषयासाठी मा. महासभेची मंजूरी घेऊन इलेक्शन कमिशनरनी परवानगी घेतली. लवकरात लवकर ही परवानगी कशी मिळेल ह्यासाठी प्रयत्न केले. त्यानंतर आपण स्टॅन्डिगला विषय ठेवला आहे. दराच्या बाबतीत गेल्यावर्षीचे दर आणि ह्या वर्षीचे दर सारखेच आहे. त्याच्यात निगोशिएशन करून गेल्या वर्षीचे जे दर आहेत तेच दर आहेत. मंजूर ११०४ होते ते आता ११२५ आहेत दर थोडेसे जास्त आहेत जबाबदारी त्यांची आहे. जे काही मटेरियल, घाण, चिखल निघणारी माती त्यासाठी प्रायव्हेट प्लॉट घेऊन त्याच्यावर भरणी करायची आहे. आपल्याकडे जागा नसल्याने ठेकेदारावर आपण जबाबदारी दिलेली आहे. जी काही घाण, चिखल , माती निघेल त्यांनी प्रायव्हेट प्लॉटची ७/१२ घेऊन भरणी करावी. त्यासाठी त्याला थोडेसे पैसे भरावे लागणार आहेत. त्यामुळे रेट थोडे जास्त आहेत.

**जुबेर इनामदार :-**

सन्मा. सदस्य धृवकिशोर पाटील तुमच्या निर्देशनास जो विषय घेऊन आले तुमची दर बाकीच्या विभागामधून प्राप्त दरापेक्षा जास्त आहेत. सार्व. बांधकामच वापरत असेल बाकीचे काये असेल ते.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

कामाचे स्वरूप वेगळे आहे. नाला सफाईचे आहे. कामाचे स्वरूप वेगळे आहे. आणि माती टाकण्यासाठी त्याला जागा घ्यावी लागणार आहे. त्यामुळे दूस-या विभागाचे दर जास्त असतील. निविदेमध्ये

तीन लोकांना पार्टीसिपेट केले होते. जे लोवेस्ट आहे त्याचे निगोशिएशन करून आपण गेल्या वर्षीच्या दराप्रमाणे ठेवण्याचा प्रयत्न केला. गेल्या वर्षीचे दर आणि ह्या वर्षीचे दर सारखेच आहेत. निविदेमध्ये तीन निविदाकारांनी पार्टीसिपेट केले होते. लोवेस्ट आशापूरा कन्स्ट्रक्शन होते त्यांना बोलवून त्यांच्याशी निगोशिएशन केले. आणि मागच्या दराप्रमाणे करण्यासाठी त्याला भाग पाडले. त्याप्रमाणे प्रस्ताव ठेवला आहे.

**जुबेर इनामदार :-**

मिरा भाईदर हा सखोल परिसर आहे नविन येणारा मिरा भाईदर हा आजचा इमारती प्लिंथ हाईट वैगेरे वाढवून हा जो प्रकार चालला आहे तो जागेवर आहे. मात्र पाऊस जास्त पडल्यानंतर ब-याच परिसरात पाऊस अजूनही साचतो. आचार संहितेमध्ये विशेष मान्यता घेऊन तातडीने २४ तासाच्या आत सभा बोलवून मान्यतेसाठी आपल्या समोर आणलेला आहे. आज त्याला आपण मान्यता दिली नाही. काही अडीअडचणी सुचना असतील त्या आपण कराव्या. मान्यता द्यावी लागेल अन्यथा त्याचा भुर्दड भरावा लागेल. हा विषय पुन्हा निविदा प्रक्रियेकडे गेला तर १५ दिवस विलंब होईल जूनमध्ये पाऊस सूरू होण्याची शक्यता असते. ठेकेदारांकडे सर्व यंत्रणा उपलब्ध नसतात. तो पण ह्या कामासाठी दूस-या एजन्सीकडून कॉन्ट्र्याक्टरकडून भाडे तत्वावर घेणार असेल त्याने आपल्याला १५ दिवस किंवा महिणाभराची संधी दिली पाहिजे. आज मंजूरी देणे गरजेचे आहे. मुन्ना सिंग जसे बोलले तसे जो परिसर सखोल आहे तिथे नालासफाई झाली नाही तर तो भरणारच. मिरारोड परिस्रमध्ये आजही पाणी भरते. मोठ मोठे नाले केले तरीही कारण पाण्याचा निकास ज्या मोठ्या नाल्यामध्ये होतो त्या नाल्याची सफाई होणे गरजेचे आहे. माझी आपल्याला विनंती राहील तुम्ही ह्या विषयाला सुचनेसह मान्यता द्यावी.

**धृवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब पावसाळ्यापूर्वी नालेसफाई करणे गरजेचे आहे. कारण आपण पास्ट एक्सटेंशन बधीतला तर प्रत्येक ठिकाणी नाले भरतात. पूर सदृश परिस्थिती निर्माण होते प्रशासनाने आवश्यक ती कारवाई केली पाहिजे. ४ मार्चला आपण टेंडर काढले बजेटला मंजूरी देताना नालेसफाईच्या कामाला प्रशासकीय आणि आर्थिक मंजूरी दिली होती. इन्डीव्हिजवल टेंडर काढले असते तर ही नौबत आली नसती. तरीसुध्दा त्याच्यानंतर १० मार्चला आचार संहिता सूरू झाली त्यानंतर आपण इलेक्शन कमिशनर कडे डिमांड केली परंतू इलेक्शन कमिशनरनी आपल्याला मार्च एप्रिलमध्ये परवानगी दिली नाही. आणि मे मध्ये परवानगी दिली. अत्यंत गरजेची गोष्ट असताना सुध्दा दोन महिने इलेक्शन कमिशनरनी आपल्याला परवानगी दिली नाही तर त्यांना कळत नव्हते का? त्यांना पण कळते ना की पावसाळ्यापूर्वी नाले सफाई करणे गरजेचे आहे. परंतू त्यांनी तब्बल दोन महिने परवानगी दिली नाही तसेच गेल्यावर्षीचे रेट आणि ह्या वर्षीचे रेट बघीतले तर आपल्याला कळले की इतर विभागामध्ये पोकलनचे रेट आणि इतर मशिनचे रेट जर जास्त असतील साहेब आम्हाला कूठेतरी वाटले म्हणजे आम्ही पॉईन्ट आऊट करतो. साहेब दूसरी गोष्ट त्याच्यामध्ये ५६० पर हर्वस संक्शन पंप इतर गव्हरमेन्टच्या डिर्पाटमेन्टमध्ये काम केले तर त्याच्यामध्ये तुमचा हा जो संक्शन पंप आहे तो आपल्याला १५००० रू. ला पर डे हर्वस ह्याची गरज काय? आपल्याकडे कन्सेप्ट आहे की मागच्यावर्षी काय झाले तेच आपण रिपीट करणार परंतू इतर गव्हरमेन्ट डिपा. घेतले. तर रेल्वेमध्ये संक्शन पंपची गरज असते रूळाच्या बाजूला ते पंप लावताता रेल्वेमध्ये ८०० रू पर डे रेट आहे.तुम्ही कॅल्क्युलेशन करा की मनपाचे किती नुकसान होते. आम्ही जर कोणती चांगली गोष्ट पॉइन्ट आऊट करून दिली. तर साहेब तुमचे काम आहे ते बघणे तुम्ही बघायला पाहिजे ही इर्मजन्सी आहे. निविदा प्रक्रिया पून्हा काढली तर १०-१५ दिवस वेस्ट होऊ शकतात. ऑलरेडी इलेक्शन कमिशनर कमीत कमी दोन महिने ही गोष्ट डिले केली आणि आम्ही असे म्हणतो मा. आयुक्तांनी ५(२)२ खाली दरपत्रक मागवायचे अधिकार आहेत त्यांनी दरपत्रक इर्मजन्सी मध्ये मागवावे आम्ही कूठे म्हणतो १५ दिवस एक महिना डिले करा. आजच्या आज दर पत्रक मागवा. शॉट नोटीसमध्ये फक्त पोकलन, जेसीपी थोडस आणि हायड्राच घ्यायचे आहे साहेब आपण जर एखादी चूक केली आणि ती आपल्याकडे आली तर आपण निर्देशनास आणून द्यायचे काम आपले आहे. प्रशासनाने त्याच्यावर इम्पलीमेन्ट केले पाहिजे याच्यामध्ये आमचा दुसरा कोणताही इश्यू नाही, हेतू नाही. परंतू काही गोष्टी आम्हाला कळल्या तर तुमच्याच डिर्पाटमेन्टच्या लोकांनी आम्हाला सांगितले की आमच्याकडे ह्या रेटनी पोकलन चालू आहे आणि तुमच्या कडे ह्या रेटनी कसे मंजूरी देते. रेल्वेमध्ये संक्शन पंप ८०० रू. पर डे मिळते डिझेल पकडून १०००रू. म्हणजे १८०० रू. ५६० पर हवर्स म्हणजे सर रेट जास्त आहेत ह्या गोष्टी आम्ही तुमच्या निर्देशनास आणून दिल्या आहेत. त्या प्रमाणे तुम्ही ॲड करावी. पून्हा निविदा प्रक्रिया वेळ लागत असेल तर ५(२)२ खाली दरपत्रक मागवून तुम्ही करू शकता. तुमच्याकडे पावर आहे.

**मा. सभापती :-**

तुम्ही एक काम करा त्या ठेकेदाराला तुम्ही बोलवा आणि निगोशिएशनसाठी परत बोलवा. त्याला सांगा की अशी परिस्थिती आहे.

**मिरादेवी यादव :-**

पाणपट्टेसाहेब चेना नदी के किनारे नाले की सफाई करना जरूरी है।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

व्हिजीट करके देखते है फायनल होने के बाद बात करेंगे।

**जुबेर इनामदार :-**

नाले सफाई काम आता सूरू करावे लागेल. चालू पावसामध्ये नाले सफाई होत नाही.

**धृवकिशोर पाटील :-**

जूबेरजी ज्यावेळी आपण बजेट मंजूर केले त्यावेळी नाले खोदाईच्या कामाला आपण इमेजिएटली..................

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

दूस-या दिवशी टेंडर काढले.

**धृवकिशोर पाटील :-**

४ मार्चला टेंडर काढले. १० मार्चला आचार संहिता सूरू झाली. आपण इमिजिएटली आचारसंहिता सुरु झाल्यानंतर आपले काम होते. इलेक्शन कमिशनरला रिपोर्ट देऊन की नाले सफाई ही खूप गरजेची आहे. अत्यावश्यक बाब आहे. आणि मागे पण आठवते की इलेक्शन या कारकिर्दीमध्ये इलेक्शनची प्रोसेस सुरु असताना आचार संहिता असताना इलेक्शन कमिशनरने आपल्याला परवानगी दिली होती. त्याप्रमाणे ती निविदा मंजूर केली होती आणि आज दोन महिने इलेक्शन कमिशनरने आपल्याला परवानगी दिली नाही. म्हणजे कुठेतरी प्रशासन कमी पडते की नाही. म्हणजे कसे आहे ही वस्तुस्थिती आहे आणि ती सभागृहापुढे मांडणे आमचे कर्तव्य आहे. ज्यावेळी आपल बजेट मंजूर झाल्यानंतर नालेसफाई. नालेसफाई ही इमरजन्सी केस आहे आणि त्याची आर्थिक आणि प्रशासकीय मंजूरी आपण ऑन दि स्पॅट त्या बजेटमध्ये आपण देतो आम्ही असे म्हणत नाही की तुम्ही त्याच्यात कामचुकारपणा केला आहे. तुम्ही १०० टक्के बरोबर केले आहे. तुम्ही ४ मार्चला टेंडर काढलेले आहे आणि १० मार्चला आपली आचारसंहिता सुरु झाली आणि आचारसंहिता सुरु झाल्यानंतर आपले काम इलेक्शन कमिशनरला पत्र देऊन की सर असे असे आहे आणि आम्हाला त्याची परवानगी द्या. कारण मला आठवते की मागे इलेक्शनची आचारसंहिता सुरु असताना २०१४ ला इलेक्शन सुरु असताना आचारसंहिता सुरु असताना आपल्याला इलेक्शन कमिशनरने परवानगी दिली आणि आपण स्पेशल मिटींग लावून २०१४ ला आपण तो ठराव केला आणि त्या नालेसफाईच्या कामाला मंजूरी दिली. परंतु साहेब मार्च गेला, एप्रिल गेला. दोन महिने होऊन गेले. आणि आपल्याला इलेक्शन कमिशनरने परवानगी दिली नाही याचा अर्थ आपला पाठपुरावा कुठेतरी कमी पडत असेल याचा अर्थ फॉलोअप कमी पडत असेल. याचा अर्थ आपण जे पुटअप केले आहे ते पुटअप बरोबर नसेल आणि इलेक्शन कमिशनरने त्याची ग्रॅव्हिटी समजली नसेल आणि म्हणून ही गोष्ट दोन महिने डिले झाली आणि आम्ही असे म्हणतच नाही. आम्ही असे म्हणतो की तुम्ही पुन्हा टेंडर काढणार. परंतु ५(२)२ अन्वये दरपत्रक मागवून इमिजिएटली कारवाई करा.

**जुबेर इनामदार :-**

धृवजी मी प्रशासनाला पाठीशी घालत नाही. मात्र तूमचा विषय इथे थांबवतो. ४/३ ला प्रशासनाने निविदा प्रक्रिया केली निविदा प्रक्रिया केल्यानंतर प्रसिध्दी झाल्यानंतर तुम्हाला किती अवधी दिला. ५० दिवसाचा कमीत कमी पाहिजे. कारण अडीज कोटीचे टेंडर आहे. ह्याचा अर्थ प्रशासनाने केलेले काम योग्य होते. त्यांनी १२/०४ ला शासनाकडे पत्र पाठवले की त्यांना सभा लावण्याची परवानगी देण्यात यावी. त्याचे उत्तर त्यांना १/५ ला आले आणि १४ दिवसात पत्राचे उत्तर प्राप्त झाले आणि त्यांनी तातडीने बैठक आज लावली आहे. इथे प्रशासनानी चूकीचे काम केले हे बोलणे योग्य नाही हा शहराशी निगडीत विषय आणि ज्वलंत विषय आहे. दरपत्रक मागवून अडीज कोटीच्या कामाला मंजूरी देता येत नाही. तुम्हाला ही मंजूर किंवा रद्द करावी लागेल. निविदा प्रक्रिया परत काढावी लागेल. पूर्ण प्रक्रिया पूर्ण करावी लागेल. साहेब, किती वेळा रि-कॉल केले.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

तीन निविदा आल्या.

**जुबेर इनामदार :-**

एकाच वेळी रि-कॉल केले म्हणजे ५० दिवसाच्या अवधीमध्ये करावे लागले असेल मा. सभापती साहेब हा विषय शहराच्या निगडीचा आहे. ज्वलंत विषय आहे. शहराच्या रहिवांशाना भूर्दड सोसावा लागेंल ह्याची मान्यता द्यावी. सुचना काय करायची ती तुम्ही करा.

**मा. सभापती :-**

पाणपट्टे साहेब ह्याच्यात आपण असे करू शकतो का की आज शनिवार आहे उद्या रविवार आहे. सोमवारी तुम्ही पून्हा एकदा ठेकेदाराला बोलवा आणि सदस्यांनी जे सांगितले आहे त्यांच्याशी पून्हा चर्चा करून मंगळवारी मिटींगमध्ये पास करू.

**संभाजी पाणपट्टे :-**

तसा ठराव मांडा.

**जुबेर इनामदार :-**

तुम्हाला सभा तहकूब करावी लागेल.

**मा. सभापती :-**

आपण दोन्ही ऑप्शन ठेवू निगोशिएशनचा पण पॉईन्ट ठेवू जर निगोशिएशनसाठी ठेकेदार तयार नाही झाला मग आपण ५(२)२ चा कमिशनरला अधिकार देऊन ते करू.

**जुबेर इनामदार :-**

५(२)२ कूठे लागू होणार ह्याच्यामध्ये नंतर करेक्शन झाले आहेत ५(२)२ सात दिवसाच्या अवधीचा आहे. निविदा प्रक्रिया दोन लाखापेक्षा जास्त पण ५० लाखापेक्षा जास्त असतील त्याला ५० दिवसाचे आहे त्याच्यावर शासनाचा नविन निर्णय आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

शासनाच्या नविन जीआर प्रमाणे टेंडरची अवधी कमी करण्यात आलेली आहे.

**जुबेर इनामदार :-**

कूठे केली.

**धृवकिशोर पाटील :-**

तो जी आर बांधकाम विभागात आहे.

**जुबेर इनामदार :-**

मागवा तसे असेल तर परत निविदा प्रक्रिया करा. होत असेल तर ७ दिवसाच्या अवधीमध्ये निविदा प्रक्रिया करा.

**धृवकिशोर पाटील :-**

आताच मी डेप्यूटी इंजिनियर मुकणे साहेबांशी बोललो, नविन जी आर जो आला आहे त्या जी आर प्रमाणे टेंडरची जो अवधी आहे कमी करायला दिला आहे.

**जुबेर इनामदार :-**

किती?

**धृवकिशोर पाटील :-**

तो जी आर काढतो जी आर आल्यावर कळेल.

**मा. सभापती :-**

पाणपट्टे साहेब ह्याच्यामध्ये निगोशिएशन करा आणि काय करता येईल ते बघा. आम्हाला पण लवकरात लवकर तो विषय करायचा आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापतीच्या परवानगीने सदरचा विषय आम्ही जानेवरीमध्ये दिला होता. जानेवारीत विषय घेतला नाही. मग तो विषय बजेटमध्ये गेला. बजेटमध्ये मंजूरी झाल्यावर दूस-या दिवशी पब्लिश केलेले आहे. इलेक्शन कमिशनरच्या परमिशनसाठी पी आर ओ ची प्रोसेस फार क्लिस्ट केली आहे. पहिले आपण जिल्हा कलेक्टरला प्रस्ताव पाठवत होतो. कलेक्टर रिकमंडेशन करून मग यूडीला पाठवत होते यूडी डिपा. सखोल अभ्यास करून मग चीफ सेक्रेटरीच्या अंडर मिटींग बसवून त्यानंतर ते रिकमंडेशन करून चीफ इलेक्शन इडियाला पाठवतो. तीन मनपा सतत एक महिण्यापासून पाठपूरावा करतात. त्या तीन महानगपालिकेला परवानगी मिळाली आहे. कल्याण- डोंबिवली, नवि मुंबई, आणि मिरा भाईदर महानगरपालिका आम्ही एक महिण्यापासून पाठपूरावा करून केलेले आहे. ती अत्यावश्यक बाब आहे. उद्या काही आपत्कालिन परिस्थिती

निर्माण झाली तर शहराला त्रास होऊ शकतो म्हणून आम्ही पाटपूरावा करून केले आहे. ह्याच्यात प्रशासनाने हलगर्जीपण केलेला नाही हे मला पटलावर आणायचे होते. म्हणून नमूद केलेले आहे.

**जुबेर इनामदार :-**

आम्ही आरोप केला नाही ही जी प्रक्रिया आहे त्यासाठी शेवटच्या क्षणापर्यंत का थांबतो त्यासाठी जानेवारीपासून सूरूवात केली पाहिजे.

**संभाजी पाणपट्टे :-**

जानेवारीच्या महासभेत मी विषय ठेवला होता. विषय घेतला नाही.

**वर्षा भानुशाली :-**

साहेब मागच्यावेळी मुर्धा खाडी साफच झाली नाही. तिकडे मॅग्रोज पण आहेत. तुमचे कर्मचारी काढायला उतरत नाही. प्रत्येक वेळी मुर्धा खाडी डूबते.

**संभाजी पाणपट्टे :-**

मागच्या वेळी प्रयत्न केला होतो आमच्यावर गुन्हा दाखल झाले.

**वर्षा भानुशाली :-**

तिकडे अतिक्रमण पण चालू आहे. त्याच्यावर पण प्रशासनाने लक्ष नाही. झोपड्या बांधतात त्यांच्यावर गुन्हा दाखल होत नाही आणि साफ सफाईसाठी गुन्हा दाखल होतो तर तुम्ही प्रशासनानी अगोदर पासून तिथे लक्ष द्यायला पाहिजे.

**संभाजी पाणपट्टे :-**

अतिक्रमण कूठे होते ते प्रभाग अधिका-याला काढायला सांगतो.

**तारा घरत :-**

नवघरच्या मागचा जो नाला आहे गोडदेववरून जाणारे नवघरचा सर्व पाणी तिथे जोतो तो नाला पूर्ण पॅक झाला आहे आपल्या उघाडीचे काम होणार होते ते झाले का? उघाडी जे दरवाजे रिपेयर करणार होते ते पण तसेच राहीले आहे.

**संभाजी पाणपट्टे :-**

मी त्याची नोंद घेऊन बांधकाम विभागाला विचारतो ते करणार होते.

**तारा घरत :-**

त्याच्यामूळेच पाणी जास्त येते. पाणपट्टेसाहेब उघाडीचे काम सूरू झाले की तिकडच्या नगरसेवकांना बोलवा.

**वर्षा भानुशाली :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पावसाळ्यापूर्वी नालेसफाई , खोदाई करणे गरजेचे व आवश्यक आहे. त्याकरीता महानगरपालिकेकडे प्राप्त झालेल्या निविदेचा दर जास्त व अवाजवी आहे . तसेच बाजार भावाशी तुलना केली असता ही जास्त आहे . यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होईल. ठेकेदरास पुन्हा वाटाघाटी करणेकरीता मा. आयुक्त यांनी बोलवावे.**

**दर कमी नाही केल्यास निविदा फेटाळण्यात यावी व मा. आयुक्त यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५(२)(२)अन्वये दरपत्रक मागवावे व त्वरीत मा. स्थायी समितीपुढे दरपत्रक मंजुरीकरीता ठेवावे**

**मिरादेवी यादव :-**

माझे अनुमोदन आहे.

**राकेश शहा :-**

आमची सुचना आहे प्रभाग क्र. ५ मध्ये फेटालनेके बादरमें प्रोसिजर लेट होता है उसकी पूरी जबाबदारी प्रशासन की रहेगी। हम स्थानिक नगरसेवक जबाबदार नही रहेंगे?

**संभाजी पाणपट्टे :-**

प्रशासन जबाबदार नही। हमने विषय दिया है।

**जुबेर इनामदार :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पावसाळ्यापूर्वी नाले सफाई /खोदाई करणेकामी जे.सी.बी., पोकलन, बोटसह पोकलन मशिन, डंपर, टोरस, क्रेन मशिन, हायड्रा मशिन, जेटींग मशिन, सिव्हर सक्कर मशिन व कंत्राटी हंगामी मजुर इ. पुरवठा दि.04/03/2019 रोजीच्या दै. मुबंई मित्र व दै. संध्याकाळ या वृत्तपत्रात व Tender Id**

**No. 2019_MBMC_435251_1 जाहिर निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली होती . दरम्यान काळात सार्वत्रिक लोकसभा निवडणुक 2019 दि.10/03/2019 पासुन मा. आदर्श आचारसहिंता लागु झाल्यामुळे भारत निवडणुक आयोगाच्या आदर्श आचारसंहितेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार आयोगाच्या Model Code of Conduct , Chapter 05 मधील Consolidated Guidelines (ix)(g) मधील मार्गदर्शन सुचनेनुसार मा .निवडणुक आयोगाकडे दि.12/04/2019 रोजी शिफारस केली होती . मा. निवडणुक आयोगाने दि .01/05/2019 रोजीच्या पत्रान्वये निविदा प्रक्रिया पुर्ण करणेस परवानगी दिली आहे.**

**वर नमुद केलेल्या कामाकरीता प्राप्त 03 निविदाधारक मे.आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी, मे. एम.बी.ब्रदर्स व मे. एम.ई. प्रोजेक्ट प्रा. लि. या निविदाधारकांच्या निविदा प्राप्त झाल्या असून सर्व निविदाधारकांनी निविदा अटीशर्तीनुसार कागदपत्रांची पुर्तता केली असल्याने ते पात्र ठरत होते.**

**नाले सफाईचे काम पावसाळा सुरु होण्यापूर्वी पूर्ण करणे अत्यावश्यक आहे . त्यामुळे कामाची निकड व अत्यावश्यक बाब म्हणून सदर निविदेतील पात्र निविदाधारक यांचा दराचा लिफाफा उघडण्यात आला होता . मे. आशापुरा कंन्स्ट्र क्शन कंपनी सादर केलेले दर इतर दोन निविदाकाराच्या तुलनेत कमी होते . मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी यांनी निविदेत सादर केलेल्या दरासंबंधी वाटाघाटी करणेसाठी दि .02/05/2019 रोजी निविदा समिती समोर बोलविण्यात आले होते. त्यानुसार मे. अशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी यांनी निविदा समितीपुढे उपस्थित राहून दर कमी केले आहेत.**

**निविदेतील प्राप्त दरामध्ये वाटाघाटी अंती सादर केलेल्या दराचा तक्ता खालीलप्रमाणे आहे.**

| Sr. No. | Type of Machinery, Equipments | निविदेत सादर केलेले दर | निविदा समितीने वाटाघाटी अंती मान्य केलेले दर | आयुक्त यांचे समवेत वाटाघाटी अंती मान्य केलेले दर |
|---|---|---|---|---|
| A | POCLAIN MACHINE - 200 | RS. 2,434/- PER HOUR | RS. 2,385/- PER HOUR | Rs. 2,296/- PER HOUR |
| | POCLAIN MACHINE WITH BOAT | RS. 2,752/- PER HOUR | RS. 2,723/- PER HOUR | Rs. 2,596/- PER HOUR |
| | JCB MACHINE | RS. 1,332/- PER HOUR | RS. 1,257/- PER HOUR | Rs. 1,257/- PER HOUR |
| B | DUMPER | RS. 7,437/- PER SHIFT | RS. 7,360/- PER SHIFT | Rs. 7,016/- PER SHIFT |
| | TORAS | RS. 10,887/- PER SHIFT | RS. 10,774/- PER SHIFT | Rs. 10,271/- PER SHIFT |
| | HAYDRA MACHINE | RS. 1,384/- PER HOUR | RS. 1,370/- PER HOUR | Rs. 1,306/- PER HOUR |
| | CRAINE MACHINE | RS. 5,503/- PER HOUR | RS. 5,400/- PER HOUR | Rs. 5,192/- PER HOUR |
| | JETTING MACHINE | RS. 37,100/- PER HOUR | RS. 36,715/- PER HOUR | Rs. 35,000/- PER HOUR |
| | SEWER SUCKER MACHINE | RS. 42,400/- PER HOUR | RS. 41,980/- PER HOUR | Rs. 40,000/- PER HOUR |
| c | MAN POWER | Rs. 1,170/- PER LABOUR /PER DAY | Rs. 1,159/- PER LABOUR /PER DAY | Rs. 1,125/- PER LABOUR /PER DAY |

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पावसाळ्यापूर्वी नाले सफाई /खोदाई करणेकामी जे.सी.बी., पोकलन, बोटसह पोकलन मशिन, डंपर, टोरस, क्रेन मशिन, हायड्रा मशिन, जेटींग मशिन, सिव्हर सक्कर मशिन व कंत्राटी हंगामी मजुर इ. पुरवठा करणेकामी मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी यांनी वाटाघाटी अंती मान्य केलेले दरानुसार निविदा स्विकारण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.**

**राजीव मेहरा :-**

माझे अनुमोदन आहे. शितल नगर जो मिरारोड का लो लाईन मिरारोड का जो एरिया है यहॉ १५ सालसे पानी भर रहा है। पाणपट्टे साहेबसे बहोत बार मिटींग हूई झीरो रिझल्ट है और वो इझिली सॉल्व किया जा सकता है। वन टाईम सॉल्यूशन है। लेकीन नही हो रहा है। आपका डिपार्टमेन्ट सिन्सियर नही या कॉलिफाईड नही है। या काम नही करना चाहता । वॉटर लेवल नही निकालना चाहता रस्ते नही निकालना चाहता।

**धृवकिशोर पाटील :-**

यह जो बोल रहे है वो सही बोल रहे है सर एक एक्झाम्पल जो एक रोड एक सिमेंट कॉक्रीट का काम चालू है। जब क्रॉसलेन बनाते हो मनपा के बांधकाम जब बनात है तब उस क्रॉसलेन में आपकी दूसरी एरिया का गटरका पाणी जा रहा है की नही जा रहा है उसकी लेवल उपर है या निचे है वो देखने का काम बांधकाम विभाग का है। आपके सुपरव्हायजर जो काम करते है आपके एस आय होते है उसने जाके देखना चाहिए की यह सिमेंट रोड बनने के बाद गटर का लेवल अगर उपर आता है। तो यहॉ से पाणी नही जायेगा वह जानकारी आपके थ्रू बांघकाम विभाग को देना चाहिए। लेकीन ऐसा बहोत जगहपे हूवा है। इसके लिए वॉटर लॉगीन भी होता है नाले सफाई नाले खोदाई करना इट इज नॉट इम्पोटन्ट लेकीन जैसे राजू भाईने बोला आपके डिपार्टमेन्ट वैसे ध्यान होना चाहिए आपके डिपार्टमेन्ट की बात बांधकाम डिपार्टमेन्ट ने सुननी चाहिए। अगर बांधकाम विभाग सुनता नही तो आपको यह बात कमिशनर को बोलना चाहिए। सर जब भी नाला बनेगा वो नाला बनाने के समय आपके एस आय का अहवाल आपको देना चाहिए।

**राजीव मेहरा :-**

आपकी बात सही है मै, पाणपट्टे साहेब  और एक बात बोलना चाहता हूँ वॉटर फ्लो और वॉटर लेव्हल जो मेजरमेन्ट है उसका एक स्पेशलाइज्ड फिल्ड है मैने कई बार देखा है हर एरिया में जो सोशल सर्व्हन्ट है प्रशासन उसके आगे झूक जाता है यह मेरा पिछले १० सालका एक्सपिरियन्स है जबकी आपको पता है की यह काम करेंगे तो नुकसान होगा फायदा नही होगा किस प्रेशरमें उनकी बाते सुनके काम करते हो अगर गलत बोल रहा हूँ तो आप बोलिए वॉटर फ्लो एक कॉमन मॅन का सब्जेक्ट नही है शायद मेरा भी नही है। क्वॉलिफाईड इंजिनिअर जिसको एक्सपिरियन्स है की वॉटर कैसे जायेगा पाणी कहॉ से निकल सकता है गटर का लेवल कैसे रखना है फिर आप जो  लोग बोलते है उनकी बात सुनते है पैसा भी खराब होता है और प्रॉब्लेम भी बढतें है एम टी एन एल रोड पे कभी पाणी नही भरा पिछली बार एम टी एन एल रोड पे भी पाणी था। एक एरिया को सेफ करने के लिए आप दुसरे एरिया को डूबाते हो। जिनको पढना लिखना नही आता आप उनकी बाते सुनके काम करते हो।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

लेवल करने का सब काम बांधकाम डिपार्टमेन्ट देखता है इसके बारे मे मैं एस आय, ज्युनियर इंजिनियर, डेप्यूटी इंजिनियर एक बार व्हिजीट करने को बोलता है।

**राजीव मेहरा :-**

मैं कितने सालसे बोल रहा हूँ। मैने लास्ट इयर बोला था।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मैने दो बार व्हिजीट किया था।

**राजीव मेहरा :-**

साहेब इस बार शितल नगर में पाणी भरेगा तो जब तक पाणी नही निकलेगा में उस पाणी मे बैठ जाऊगा। वहॉ के लोगो को तकलीफ दी जा रही है।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

इजिनियर आके हम सर्व्हे करते है।

**राजीव मेहरा :-**

२० सालसे प्रॉब्लेम है कोई इंजिनियर गया नही आप रिस्पॉन्सिबल हो। हर साल नुकसान होता है। एक दिन आपको पैसा नही मिलता है तो आप कचरा नही उठाते हो वहॉ के रेसिडन्स का काम कौन करेगा। कचरा सॅग्रीगेशन नही हूवा आपने ४ दिन कचरा नही उठाया। यह १० सालसे प्रॉब्लेम सॉल्ह नही कर रहे है तो इसके लिए हमको क्या करना चाहिए। पब्लिकने क्या करना चाहिए। साहब कितने साल लगेगे इस बारीश के पहले करके दोगे।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

इस बारीश के पहले करेंगे। आजही बांधकाम विभाग को बोलता हूँ।

**राजीव मेहरा :-**

हमने जो काम दिया वा काम नही हूआ।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आप तूरंत आ जाओ मै वानखेडे को बोलता हूँ।

**राजीव मेहरा :-**

कितनी बार बूलाया कितनी बार जॉईन्ट मिटींग हूई है।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

दो बार आप साथ मिटींग हूई है।

**राजीव मेहरा :-**

मिटींग हूई लेकिन सोल्यूशन किधर आया है।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

क्या हूआ वो मै बांधकाम को पूछता हूँ।

**राजीव मेहरा :-**

जहॉ पे टेंडर नही निकला वहॉ पे आपने गटर बनवाया है।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

वो मै बांधकाम विभाग से पूछता हूँ।

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १ करिता दोन ठराव आले आहेत पहिला ठराव सुचक श्रीम.वर्षा भानुशाली अनुमोदक श्रीम. मिरादेवी यादव दूसरा ठराव सुचक श्री. जुबेर इनामदार अनुमोदक श्री. राजीव मेहरा प्रथम दूसरा ठराव मतदानास पूकारतो सुचक श्री. जुबेर इनामदार ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ असतील त्यांनी हात वर करायचे आहेत सुचक श्रीम. वर्षा भानुशाली ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ असतील त्यांनी हात वर करायचे आहेत

**दिप्ती भट :-**

लोक ५-५ दिवस पाण्यामध्ये बूडतात आणि पाच वर्ष जीवनाच्या पाठी जातात. आम्ही दोन तास बसायला तयार  आहोत पण साफ सफाई करायला घ्या.

**मा. सभापती :-**

सुचक श्रीम. वर्षा भानुशाली ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ८ विरोधात २ तटस्थ ३ इतकी मत पडली आहेत श्रीम. वर्षा भानुशाली ह्यांचा ठराव बहूमताने मंजर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ०१ :-**

**पावसाळ्यापूर्वी नाले सफाई कामाच्या निविदेतील दरास मंजुरी मिळणेबाबत.**

ठराव क्र. ०१ :-

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पावसाळ्यापूर्वी नालेसफाई , खोदाई करणे गरजेचे व आवश्यक आहे. त्याकरीता महानगरपालिकेकडे प्राप्त झालेल्या निविदेचा दर जास्त व अवाजवी आहे . तसेच बाजार भावाशी तुलना केली असता ही जास्त आहे . यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होईल. ठेकेदरास पुन्हा वाटाघाटी करणेकरीता मा. आयुक्त यांनी बोलवावे.**

**दर कमी नाही केल्यास निविदा फेटाळण्यात यावी व मा. आयुक्त यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५(२)(२)अन्वये दरपत्रक मागवावे व त्वरीत मा. स्थायी समितीपुढे दरपत्रक मंजुरीकरीता ठेवावे.**

**सुचक :- श्रीम. वर्षा भानुशाली अनुमोदन :- श्रीम. मिरादेवी यादव**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. व्यास रवि वासुदेव | १ | श्री. राजीव मेहरा | १) श्रीम. दिप्ती भट्ट |
| २ | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | २ | श्री. जुबेर इनामदार | २) श्रीम. वंदना विकास पाटील |
| ३ | श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल | | | ३) श्रीम. तारा घरत |
| ४ | श्रीम. यादव मीरादेवी रामलाल | | | |
| ५ | श्री. मोहन गोपाळ म्हात्रे | | | |
| ६ | श्रीम. वर्षा भानुशाली | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | **श्री. राकेश शाह** | | |
| ८ | **श्रीम. निला बर्नाड सोंस** | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

सही/-
**सभापती**
**स्थायी समिती**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २, **मनपा. क्षेत्रात पावसाळ्या दरम्यान सखल भागात साचणारे पावसाचे पाणी उपसा करणे कामी भाड्याने 10HP क्षमतेचे सक्शन पंप पुरवठा कामाच्या निविदेतील दरास मंजुरी मिळणेबाबत.**

**जुबेर इनामदार :-**

पंपातून पंप करून टाकता कूठे.

**दिप्ती भट :-**

ह्या गटरामधून त्या गटरामध्ये पाणी सोडताना पून्हा पाणी तिकडे येतो.

**जुबेर इनामदार :-**

मैं आपको टेक्नीकल रिझन बता रहा था। ८०० रू. के लिए कोई दिनभर के लिए पंप नही देगा। क्योकी उसको डिझेल लगता है। मॅनपावर लगता है।

**धृवकिशोर पाटील :-**

डिझेल का रेट अलग है इसका रेट अलग है आपको रेल्वे का बाकायदा ऑर्डर लाके देता हूँ।

**दिप्ती भट :-**

साहेब तिथे २४ तास माणूस असतो मी ३.०० वाजेपर्यत वॉर्ड मध्ये फिरते.

**धृवकिशोर पाटील :-**

तुमचे म्हणणे बरोबर आहे आम्ही नाही कूठे म्हणतो.

**मोहन म्हात्रे :-**

तिकडे २४ तास माणूस ठेवायलाच लागतो.

**धृवकिशोर पाटील :-**

तुम्ही ज्यावेळी पंप घेता त्यावेळी तो पंप चालू केल्यानंतर तो माणूस दुसरीकडे जातो तो माणूस राऊडअपला असतो तिथे परमनंन्ट ऑपरेटर नसतो. आज कमीत कमी ४२ ठिकाणी जर तुम्ही मला ऑपरेटर दाखवले तर मी राजीनामा देतो.

**दिप्ती भट :-**

आमच्याकडे एक आहे.

**जुबेर इनामदार :-**

नालेसफाई झाली नाही तर त्या पंपाचे तुम्ही काय करणार? नाले सफाईला तुम्ही विरोध केला तुम्ही तटस्थ बसले तुम्ही विरोध करायला पाहिजे होता.

**दिप्ती भट :-**

आम्ही दोघांना बोलतो.

**जुबेर इनामदार :-**

आम्ही शहराच्या हितामध्ये बोलतो तुम्ही विरोध करायला पाहिजे होता त्या नाल्यामधून गाळच निघाला नाही तर पंपामधून तो पाणी जाणार कूठे? तुम्हाला खरतर पंपाची गरज नाही.

**मोहन म्हात्रे :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पावसाळ्यात सखल /अतिसखल भागामध्ये साचणारे पावसाचे पाणी उपसा करणेकामी विविध क्षमतेचे सक्शन पंप पुरवठा करण्याची निविदेचे दर प्रत्येक तासी रु. ५६०/- प्राप्त झाले आहे . सदरचे दर हे अवाजवी असून बाजार दरापेक्षा खुपच जास्त असून स दर**

**सक्शन पंप प्रती तासा ऐवजी प्रती महिन्याप्रमाणे भाड्याने घेतल्यास दर कमी होवून महापालिकेचा आर्थिक फायदा होईल, ठेकेदरास पुन्हा वाटाघाटी करणेकरीता मा. आयुक्त यांनी बोलवावे.**

**दर कमी नाही केल्यास निविदा फेटाळण्यात यावी व मा. आयुक्त यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५(२)(२) अन्वये दरपत्रक मागवावे व त्वरीत मा . स्थायी समितीपुढे दरपत्रक मंजुरीकरीता ठेवावे.**

**निला सोंस :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती महोदय माझी सुचना आहे, प्रशासनाने पाण्याचे पंप तिथेच वापरावे जिथे पाण्याचा निकास होण्याची शक्यता आहे. अन्यथ तिथे वाटाघाटा करा दर कमी करा पंप तिथेच वापरा जिथे पाण्याचा निकास होऊ शकतो असा आमचा कूठलाही विषय लोकांनी लक्षात आणून दिले की जमलेल्या पाण्याच्या परिसरातच ते पाणी टाकले जात आहे तर अशा विषयावर आमचा विरोध असणार त्यासाठी आम्ही प्रशासनाला कारणीभूत ठरवू.

**संभाजी पाणपट्टे :-**

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो, तिकडचे सोसायटीची लोक सदस्याकडे जातात सदस्य पॅनीक होतात आणि आम्हाला लगेच फोन करतात. तुम्ही पॅनिक होऊ नका. काही फायदा होत नाही. एखाद्या सोसायटीमध्ये पंप ठेवला की त्या सोसायटीला आम्हाला पंप का नाही असा विषय होतो. प्रत्येक सदस्याला आपल्या एरियामध्ये पंप असला पाहिजे असे वाटते.

**जुबेर इनामदार :-**

हा निर्णय प्रशासनाने घ्यावा कारण हा तांत्रिक विषय आहे.

**राकेश शहा :-**

पानपट्टे साहेब मेरे प्रभाग मे तीन जगहपे पाणी का फ्लो एकही गटरसे जा रहा है। जिसका पाणी का फोर्स रहता है उसका पाणी पहले जाता है। इसके लिए हम पंप लगाते है वो सिधा-सिधा आके हम गटर मे डालते है।

**जुबेर इनामदार :-**

आमचा विरोध नाही पून्हा एकदा बोलतो दराच्या विषयामध्ये वाटाघाटी करा. तुम्ही आयुक्तांना अधिकार दिले आहेत. विषय असा आहे जिथे खरोखर गरज आहे. जिथे पाणी साचलेला आहे तो पाणी उचलून साचलेल्या परिसरामध्ये टाकायचा त्याचा काही अर्थ होत नाही.

**मा. सभापती :-**

ठराव सुचनेसह मंजूर.

**प्रकरण क्र. ०२ :-**

**मनपा. क्षेत्रात पावसाळ्या दरम्यान सखल भागात साचणारे पावसाचे पाणी उपसा करणे कामी भाड्याने 10HP क्षमतेचे सक्शन पंप पुरवठा कामाच्या निविदेतील दरास मंजुरी मिळणेबाबत.**

ठराव क्र. ०२ :-

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पावसाळ्यात सखल/अतिसखल भागामध्ये साचणारे पावसाचे पाणी उपसा करणेकामी विविध क्षमतेचे सक्शन पंप पुरवठा करण्याची निविदेचे दर प्रत्येक तासी रु. ५६०/- प्राप्त झाले आहे . सदरचे दर हे अवाजवी असून बाजार दरापेक्षा खुपच जास्त असून सदर सक्शन पंप प्रती तासा ऐवजी प्रती महिन्याप्रमा णे भाड्याने घेतल्यास दर कमी होवून महापालिकेचा आर्थिक फायदा होईल, ठेकेदरास पुन्हा वाटाघाटी करणेकरीता मा. आयुक्त यांनी बोलवावे.**

**दर कमी नाही केल्यास निविदा फेटाळण्यात यावी व मा. आयुक्त यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५(२)(२) अन्वये दरपत्रक मागवावे व त्व रीत मा. स्थायी समितीपुढे दरपत्रक मंजुरीकरीता ठेवावे.**

**सुचक :- श्री. मोहन म्हात्रे        अनुमोदन :- श्रीम. निला सोंस**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. जुबेर इनामदार यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

**प्रशासनाने तिथेच पंप वापरावे जिथून पाणी निकास होण्याची शक्यता आहे. तुम्ही वाटाघाटी करा, दर कमी करा चांगली गोष्ट आहे . पाणी उपसा करताना बाजुच्या परिसरात टाकला जात आहे याला आमचा विरोध आहे. यासाठी प्रशासनास कारणीभुत ठरविणार.**

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**

सही/-

**सभापती**

**स्थायी समिती**

मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. सभापती :-**

सभा संपली असे जाहिर करतो.

(सभा संपण्याची वेळ दूपारी. १२.२० वाजता)

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(वासुदेव शिरवळकर)

नगरसचिव

मिरा भाईंदर महानगरपालिका